जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JUN 2024
लोकमत



डॉ. अभिजित गाताडे, डॉ. प्रवीणकुमार पाटील, हर्षवर्धन कांबळे यांनी संकलन केलेल्या पुस्तकाचे अनावरण डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

# आहारामध्ये भरड धान्यांचा समावेश करा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भरड धान्यांचा उपयोग दैनंदिन आहारामध्ये होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये आयोजित ऑनलाईन बैठकीमध्ये 'मिलेट द नेचर्स क्रॉप' पुस्तकाच्या अनावरणप्रसंगी ते बोलत होते.

या पुस्तकासाठी बहिस्थ परीक्षक म्हणून परीक्षण केलेले इंडिया मिलेट इनिशिएटिव्हचे चेअरमन डॉ. [illegible] हे ऑनलाईन उपस्थित होते.

अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. अभिजीत गाताडे, डॉ. प्रवीणकुमार पाटील, हर्षवर्धन कांबळे यांनी या पुस्तकाचे संकलन केले आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते हे पुस्तक ई-बुक फॉर्ममध्ये विद्यापीठाच्या वेबसाईटवर सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. इंग्रजी भाषेमध्ये असलेले हे पुस्तक मराठी भाषेमध्ये उपलब्ध करून देण्याची सूचना डॉ. शिर्के यांनी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JUN 2024
लोकमत



कोल्हापुरातील केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या शिफारशीवरुन व्यवस्थापन परिषदेने 'एम्पॉवर्ड अॅटॉनॉमी' महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला. त्याचे पत्र कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी अध्यक्ष सुनील कुलकर्णी यांच्याकडे प्रदान केले. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह उपस्थित होते.

# 'केआयटी'ला 'एम्पॉवर्ड ऑटॉनॉमी'चा दर्जा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या शिफारशीवरून व्यवस्थापन परिषदेने 'एम्पॉवर्ड अॅटॉनॉमी' महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला. आता 'केआयटी'ला शिवाजी विद्यापीठ व महाविद्यालयाची जॉइंट पदवी प्रदान करता येईल.' राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तत्त्वानुसार केआयटी महाविद्यालय भविष्यात स्वत:ची पदवी बहाल करण्यासाठी मार्गाक्रमण करणार आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत केआयटीला पत्र देण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी, ज्येष्ठ विश्वस्त सचिन मेनन, भरत पाटील व रजिस्ट्रार डॉ. मनोज मुजुमदार उपस्थित होते.

09 JUN 2024

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरात वाढत्या तापमान वाढीवर चर्चासत्र

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, निमंत्रितांनी झाडाला पाणी घालून पर्यावरण दिनाचा संकल्प मांडला.

**कोल्हापूर :** कोल्हापूरचे तापमान वाढ रोखण्याचा निर्धार बुधवारी पर्यावरण दिनी येथील पर्यावरणप्रेमींनी केला. त्यासाठी कृती कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

यावर्षी उन्हाळ्यात देशभरात उच्चांकी तापमान नोंदले गेले. कोल्हापूरसारख्या तुलनेने कमी तापणाऱ्या जिल्ह्याला उन्हाच्या झळा सहन कराव्या लागल्या. वाढलेले तापमान हा कोल्हापूरकरांसाठी गंभीर प्रश्न बनला आहे. ५ जून या पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वाढलेल्या तापमानासंदर्भात उहापोह करण्याकरता 'कोल्हापूर ४१ अंश सेल्शियस' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव यांनी 'शहरी उष्णताद्वीप' या विषयावर मांडणी केली. पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांनी कोल्हापूरच्या विशिष्ट अशा गुणधर्मांचा आणि सांख्यिकीचा आलेख मांडला. आर्किटेक्ट वंदना पुसाळकर, गार्डन्स क्लबच्या पल्लवी कुलकर्णी, अनिल चौगुले, अजिंक्य बेर्डे यांनी मते मांडली. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री. साळोखे यांनी शासनाची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे वनस्पती अभ्यासक डॉ. मधुकर बाचूळकर यांनी नवीन झाडे लावण्याबाबत आणि अस्तित्वातील झाडे टिकवण्याबाबत गांभीर्याने लक्ष घालण्याची गरज व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना पर्यावरण विभागाचे माजी विभागप्रमुख, डॉ. प्रकाश राऊत यांनी विद्यापीठाची वृक्ष संवर्धनातील भूमिका स्पष्ट केली.

जनसंपर्क कक्ष


09 JUN 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कळसूबाई, रतनगड किल्ल्यावर पालीच्या नव्या प्रजातींचा शोध

## बेसाल्ट खडकात अधिवास; शिवाजी विद्यापीठासह ठाकरे वाईल्ड लाईफच्या संशोधकांचे यश

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर कळसूबाई आणि रतनगड किल्ल्यावरील गोल बुबुळांच्या प्रदेशनिष्ठ पालींच्या दोन नवीन प्रजातींचा शोध लावण्यात भारतीय संशोधकांना यश आले आहे. दोन्ही प्रजाती उंच शिखरांच्या टोकांवरील बेसाल्ट खडकाच्या अधिवासात आढळतात. या संशोधनामध्ये ठाकरे वाईल्ड लाईफ फाउंडेशन आणि शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचा सहभाग होता. हे संशोधन अक्षय खांडेकर यांच्या शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागामधून सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा भाग आहे आणि प्रा. डॉ. सुनील गायकवाड त्यांचे मार्गदर्शक आहेत. त्यासोबतच या संशोधनामध्ये ठाकरे वाईल्ड लाईफ फाउंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, ईशान अगरवाल, सत्पाल गंगलमाले आणि सौरभ किनिंगे यांचा सहभाग आहे. दोन्ही प्रजातींचा समावेश 'निमास्पिस' या कुळामध्ये केला आहे. गोल बुबुळे हे निमास्पिस कुळातील पालींचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अहमदनगर जिल्ह्यातील रतनगड किल्ल्यावरून शोधलेल्या पालीचे नामकरण 'निमास्पिस बेसाल्टीकोला' असे करण्यात आले आहे. बेसाल्ट दगडांवरील मर्यादित वावर यावरून तिचे नामकरण केले आहे. कळसूबाई शिखरावरून शोधल्या गेलेल्या पालीचे नामकरण तिच्या आढळक्षेत्रावरून 'निमास्पिस कळसूबाईन्सीस' असे केले आहे. 'निमास्पिस कळसूबाईन्सीस' ही प्रजाती कळसूबाई शिखर आणि त्याच पर्वतरांगेतील अलंग किल्ल्यावर आढळून आली. ही प्रजाती भारतीय द्विपकल्पामधील निमास्पिस कुळातील सर्वांत दक्षिणेकडील प्रजाती ठरली आहे. पाठीवरील ट्यूबरकलची संख्या, मांडीवरील ग्रंथींची संख्या, पृष्ठभागाला धरून राहण्यासाठी आवश्यक बोटांवरील लॅमेल्यांची संख्या आणि वैशिष्ट्यपूर्ण जनुकीय संचांवरून या पाली एकमेकांपासून आणि कुळातील इतरांपासून वेगळ्या प्रजातीच्या ठरतात.



निमास्पिस कळसूबाईन्सीस



निमास्पिस बेसाल्टीकोला

❝ निमास्पिस कुळातील पाली थंड अधिवासातील वावर यासाठी ओळखल्या जातात. नव्याने शोधलेल्या दोन्ही प्रजाती ११०० मीटरपेक्षा उंच पर्वतांवरील निम-सदाहरित जंगलांमधील आणि कड्यांवरील बेसाल्ट दगडांवरती आढळतात. कमी उंचीवरील गरम जागा त्यांच्यासाठी अनुकूल नाहीत. या दोन्ही प्रजातींच्या आढळक्षेत्रांमधील सरळ रेषेतील अंतर फक्त सात किमी. आहे.

- अक्षय खांडेकर.

❝ महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखरावरून पालीची नवी प्रजाती शोधणे ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. कळसूबाई शिखर, रतनगड आणि अलंग किल्ला या ठिकाणांना महाराष्ट्राच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या संशोधनामुळे कळसूबाई, रतनगड आणि अलंग शिखर या ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या परिसरातील जैवविविधतेसंदर्भातील वैशिष्ट्ये अधोरेखित झाली आहेत.

- डॉ. सुनील गायकवाड.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 9 JUN 2024
पुण्यनगरी

# कळसूबाई, रतनगड किल्ल्यावरून पालींच्या दोन प्रजातींचा शोध

## शिवाजी विद्यापीठ व ठाकरे वाईल्ड लाईफच्या संशोधकाचे यश

कोल्हापूर : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसूबाई आणि रतनगड किल्ल्यावरून गोल बुबुळांच्या प्रदेशनिष्ठ पालींच्या दोन नवीन प्रजातींचा शोध लावण्यात संशोधकांना यश आले. या संशोधनामध्ये ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशन आणि शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचा सहभाग होता.

हे संशोधन अक्षय खांडेकर यांच्या शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागामधून सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा भाग आहे. प्रा. डॉ. सुनील गायकवाड त्यांचे मार्गदर्शक आहेत. या संशोधनात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, ईशान अगरवाल, सतपाल गंगलमाले, सौरभ किनिंगे यांचा सहभाग आहे. नव्याने शोधलेल्या दोन्ही प्रजातींचा समावेश 'निमास्पिस' या कुळामध्ये केला आहे. गोल बुबुळे हे निमास्पिस कुळातील पालींचे वैशिष्ट्यआहे.



'निमास्पिस बेसाल्टीकोला'



'निमास्पिस कळसूबाईन्सिस'

अहमदनगर जिल्ह्यातील रतनगड किल्ल्यावरून शोधलेल्या पालीचे नामकरण 'निमास्पिस बेसाल्टीकोला' असे केले असून, बेसाल्ट दगडांवरील मर्यादित वावरावरून तिचे नामकरण केले आहे. कळसूबाई शिखरावरून शोधलेल्या पालीचे नामकरण आढळक्षेत्रावरून 'निमास्पिस कळसूबाईन्सिस' असे केले आहे. ही प्रजाती कळसूबाई शिखर आणि त्याच पर्वतरांगेतील अलंग किल्ल्यावर आढळून आली. ही प्रजाती भारतीय द्वीपकल्पामधील निमास्पिस कुळातील सर्वात दक्षिणेकडील प्रजाती ठरली आहे. पाठीवरील ट्यूबरकलची संख्या, मांडीवरील ग्रंथींची संख्या, पृष्ठभागाला धरून राहण्यासाठी आवश्यक बोटांवरील लॅमेल्लांची संख्या आणि जनुकीय संचावरून या पाली एकमेकांपासून आणि कुळातील इतरांपासून वेगळ्या प्रजातींच्या ठरतात.

> ११०० मीटरपेक्षा अधिक उंचीवर आढळणाऱ्या निमास्पिस कुळातील पाली थंड अधिवासातील वावरासाठी ओळखल्या जातात. नव्याने शोधलेल्या दोन्ही प्रजाती ११०० मीटरपेक्षा उंच पर्वतांवरील निम-सदाहरित जंगलांमधील आणि कड्यांवरील बेसाल्ट दगडांवरती आढळतात. कमी उंचीवरील गरम जागा त्यांच्यासाठी अनुकूल नाहीत. या दोन्ही प्रजातींच्या आढळक्षेत्रांमधील सरळ रेषेतील अंतर फक्त ७ कि.मी. आहे.
>
> - अक्षय खांडेकर

> कळसूबाई शिखर परिसराची जैवविविधता अधोरेखित महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखरावरून पालीची नवी प्रजाती शोधणे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. कळसूबाई शिखर, रतनगड, अलंग किल्ला या ठिकाणांना इतिहासात अनन्यसाधारण महत्व आहे. नव्या पालींसाठी या शिखरांची अग्रस्थाने आश्रयस्थाने राहिली आहेत. नव्याने शोधलेल्या पाली प्रदेशनिष्ठ आहेत. त्या इतरत्र कुठेही आढळत नाहीत.
>
> - डॉ. सुनील गायकवाड

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JUN 2024
पुढारी

# कळसूबाई शिखर, रतनगड किल्ल्यावरून पालींच्या दोन नव्या प्रजातींचा शोध

● शिवाजी विद्यापीठ व ठाकरे वाईल्ड लाईफच्या संशोधकांचे यश


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर कळसुबाई व रतनगड किल्ल्यावरून गोल बुबुळांच्या प्रदेशनिष्ठ पालींच्या दोन नवीन प्रजातींचा शोध लावण्यात ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशन व शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यश आले आहे. दोन्ही प्रजाती उंच शिखरांच्या टोकांवरील बेसाल्ट दगडांच्या अधिवासात आढळतात.

हे संशोधन अक्षय खांडेकर यांच्या शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागामधून सुरू असलेल्या पीएच.डी. संशोधनाचा भाग असून, प्रा. डॉ. सुनील गायकवाड त्यांचे मार्गदर्शक आहेत. त्यासोबत ठाकरे वाईल्डलाईफ फाऊंडेशनचे संशोधक तेजस ठाकरे, ईशान अगरवाल, सत्पाल गंगलमाले, सौरभ किनिंगे यांचा सहभाग आहे.

## ११०० मीटरपेक्षा अधिक उंचीवर आढळतात

निमास्पिस कुळातील पाली थंड अधिवासातील वावरासाठी ओळखल्या जातात. नव्याने शोधलेल्या दोन्ही प्रजाती ११०० मीटरपेक्षा उंच पर्वतांवरील निम-सदाहरित जंगलांमधील व कड्यांवरील बेसाल्ट दगडांवर आढळतात. कमी उंचीवरील गरम जागा त्यांच्यासाठी अनुकूल नाहीत. या दोन्ही प्रजातींच्या आढळक्षेत्रांमधील सरळ रेषेतील अंतर फक्त ७ कि.मी. आहे. रतनगड आणि अलंग-कळसुबाई पर्वत रांग यांच्यामध्ये असलेल्या शुष्क-सपाट प्रदेशाने या दोन पालींना एकमेकांपासून वेगळे केले आहे.





> महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखरावरून पालीची नवी प्रजाती शोधणे आनंदाची गोष्ट आहे. कळसुबाई शिखर, रतनगड व अलंग किल्ल्यांना इतिहासात महत्त्व आहे. नव्या पालींसाठी या शिखरांची अग्रस्थाने अशीच आश्रयस्थाने राहिली आहेत. या संशोधनामुळे कळसुबाई, रतनगड आणि अलंग शिखर ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या परिसरातील जैवविविधते संदर्भातील वैशिष्ट्ये अधोरेखित झाली आहे.
>
> **- डॉ. सुनील गायकवाड, संशोधक**

नव्याने शोधलेल्या दोन्ही प्रजातींचा समावेश 'निमास्पिस' या कुळामध्ये केला आहे. गोल बुबुळे हे निमास्पिस कुळातील पालींचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. अहमदनगर जिल्ह्यातील रतनगड किल्ल्यावरून शोधलेल्या पालीचे नामकरण 'निमास्पिस बेसाल्टीकोला' असे केले आहे. बेसाल्ट दगडांवरील मर्यादित वावरावरून तिचे नामकरण केले आहे. कळसुबाई शिखरावरून शोधल्या गेलेल्या पालीचे नामकरण तिच्या आढळक्षेत्रावरून 'निमास्पिस कळसुबाईन्सीस' असे केले आहे.

'निमास्पिस कळसुबाईन्सीस' ही प्रजाती कळसुबाई शिखर आणि त्याच पर्वतरांगेतील अलंग किल्ल्यावर आढळून आली. ही प्रजाती भारतीय द्वीपकल्पामधील निमास्पिस कुळातील सर्वांत दक्षिणेकडील प्रजाती ठरली आहे. पाठीवरील ट्युबरकलची संख्या, मांडीवरील ग्रंथींची संख्या, पृष्ठभागाला धरून राहण्यासाठी आवश्यक बोटांवरील लॅमेल्यांची संख्या आणि वैशिष्ट्यपूर्ण जनुकीय संचांवरून या पाली एकमेकांपासून व कुळातील इतरांपासून वेगळ्या प्रजातीच्या आहेत.